नियमित दरखास्त क्र.०२/२०२०.

अजिनाथ **वि**. सिताराम

**निशाणी क्रं.४२ वर पुढे**

**धनकोतर्फे सा.क्र.१. कडूबा दशरथ जाधव यांचा उलटतपास ऋणकोतर्फे विधीज्ञ श्री.डी.पी.काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

दिवाणी दावा क्र.४०/२०१४ मधील वादमिळकतीच्या चतूर्सीमा पूर्वेस – गट नं. २२ ची संपादीत जमीन, पश्चिम – सरकारी गायरान, उत्तर – रामराव वाळूबा यांची जमीन, दक्षिण – विश्वास विठ्ठलरा जाधव यांची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, विश्वास विठ्ठलराव जाधव यांच्यावर या न्यायालयात अतिक्रमित क्षेत्राचा ताबा मिळण्याबाबत दावा क्र. ४५/२०१४ दाखल केला आहे. तो दावा आज रोजी प्रलंबित आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्या दाव्यात कोर्ट कमिशनर मार्फत मोजणी झाली आहे. हे मी सांगू शकत नाही की, मोजणीचा अहवाल दाखल आहे किंवा नाही. मी त्याप्रकरणामधे आक्षेप दाखल केला नाही. हे मी सांगू शकत नाही की, त्या प्रकरणात मी नकाशा व अहवाल मान्य केला आहे किंवा नाही. त्या मोजणीमधे जमीन कोणाकडे निघते हे सांगू शकत नाही. हे मला माहिती नाही की, त्या प्रकरणात विश्वास जाधव यांच्याकडे काही जमीन व काही जमीन माझ्याकडे जास्तीची असल्याचे नमूद आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे भाउ रावसाहेब हे दि. १६.०४.२०२३ रोजी मयत झाले आहेत.

**०२.** हे म्हणणे खरे नाही की, पोलीस संरक्षण मिळण्याकरीता ही दिवाणी दरखास्त दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, ही दरखास्त फक्त ताब्यासाठी दाखल केली. माझ्या गटातील जमीनीवर ताबा मिळावा म्हणून ही दरखास्त दाखल केली. हे म्हणणे खरे आहे की, त्याकामी पोलीस संरक्षण मिळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी भुमीअभिलेख यांचे कार्यालयीन कर्मचारी घेवुन जायमोक्यावर मोजणी करुन दिली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पंचनामा केला.

**०३.** दिनांक १३/०५/२०२० रोजी शेतात अडीअडथळा करीत असलेल्या ट्रॅक्टरचा क्र.९ होता व त्याचे मालक राजु मालोदे होते. मी तक्रारीमधे ट्रॅक्टर मालकाचा उल्लेख केला होता. मी शपथपत्र दाखल केले त्यामधील मजकूर बरोबर आहे. नि.क्र.१ मधील मजकूर खोटा आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरण दाखल केल्यानंतर शपथपत्रात नमूद असलेल्या घटना घडल्या. हे म्हणणे खरे आहे की, प्रकरण दाखल केले तेव्हा पोलीस संरक्षणाचीच मागणी होती. इतर कोणतीही मागणी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयाच्या आदेशाचे

उल्लंघन केल्याबाबत अवमान याचिका दाखल केली नाही. त्या प्रकरणाचा नंबर व तारीख मला आठवत नाही.  ऋणको क्र.१ वर ते प्रकरण दाखल आहे. हे म्हणणे खरे नाही की, अवमान याचिका ऋणको विरुध्द दाखल केली नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी जमीनीचा ताबा दिला नाही म्हणून हे प्रकरण दाखल केले.

**०४.** आमच्या भाउबंदमधे आपसात वाटण्या झाल्या. गट नं.२० मधे वाटणी पूर्व–पश्चिम झाली. या गटाच्या पूर्व बाजुला माझ्या मुलाची जमीन आहे. ती जमीन रावसाहेब यांच्याकडून घेतली. वाटण्या झाल्यानंतर ती जमीन घेतली. हे म्हणणे खरे आहे की, त्या जमीनीमधे चतूर्सीमेत माझी जमीन उत्तर बाजुने होती. त्या खरेदीखताच्या चतूर्सीमा अद्याप दुरुस्त केल्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, वकीलांनी शपथपत्र तयार केले व मी फक्त त्यावर सही केली. हे म्हणणे खरे आहे की, दिवाणी दावा ४०/२०१४ दाखल केल्यापासून माझी अशी शंका आहे की, ऋणको हे माझी बदनामी करतात.  हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी कारवाई केल्याबाबत मला सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, ऋणकोवर कोणता वचक बसला नाही. हे म्हणणे खरे आहे की, ऋणकोला शासन व्हावे म्हणून मी न्यायालयात आलो. हे म्हणणे खरे नाही की, सदरची दरखास्त खोटी दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, ऋणकोने कोणताही त्रास दिला नाही. हे म्हणणे खरे नाही की, ऋणकोची संपादीत झालेली जमीन त्याने कसू नये ही माझी इच्छा आहे. हे म्हणणे खरे आहे की, पुराव्याच्या शपथपत्रात काय लिहिले हे सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.02.25 11:01:48 +0530

(**जी.डी. गुरनुले**)

दिनांक २४.०२.२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,खुलताबाद.